**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :–

**माझे नाव** : **अविनाश रंगनाथ कांबळे,**
वय : ३४ वर्षे, व्यवसाय : जवान, राज्य उत्पादन शुल्क, अहमदनगर
नेमणूक : राज्य उत्पादन शुल्क, ता.जि. अहमदनगर.

**शपथेवर सरतपास अभियोगपक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री.डी.एल. वाडेकर :**

मी राज्य उत्पादन शुल्क, अहमदनगर येथे सन २०१२ पासुन जवान या पदावर कार्यरत आहे. दि.२६/०५/२०२४ रोजी मी तसेच माझे सहकारी आमच्या कार्यालयात हजर होतो. त्यावेळी माझे वरिष्ठ श्री.एस.आर. कुसळे यांनी बोलावुन आम्हाला सांगितले की, त्यांना गुप्त बातमीदारांकडुन बातमी मिळाली आहे की, एक इसम नामे मारुती छबु चौघुले हा चौघुगे वस्ती, खळगामळा, नेप्ती येथे अवैधरित्या गावठी हातभट्टीची दारु निर्मिती व विक्री करत आहे, त्याठिकाणी आपणास जावयाचे आहे.

२. त्यानंतर माझे वरिष्ठ श्री.कुसळे यांनी दोन पंचांना बोलावुन त्यांना बातमीतील हकीकत सांगून पंच होण्याकामी विनंती केली असता त्यांनी होकार दिल्याने त्यांना सोबत घेवुन मी, माझे सहकारी तसेच आमचे वरिष्ठ श्री.कुसळे असे सरकारी वाहनाने नेप्ती या गावात गेलो.

३. त्यावेळी आम्ही पाहिले की, एक इसम त्याचे घराच्या आडोशाला अवैधरित्या गावठी हातभट्टीची दारु तयार व विक्री करत आहे. त्यावेळी आम्ही त्या इसमास आमची ओळख सांगितली व आमचे येण्याचे कारण सांगितले. त्यावेळी आम्ही त्या इसमास त्याचे नाव गांव विचारले असता त्याने त्याचे नाव मारुती छबु चौगुले असे सांगितले.

SACHIN RAJARAM SHINDE
Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.03.09 12:22:45 +0530

४. त्यावेळी आम्ही घटनास्थळाची झडती घेतली असता आम्हाला एक हातभट्टी दारू तयार करण्यासाठीचा २०० लिटरचा भट्टी बॅरल व त्यामध्ये अंदाजे ५० लिटर उकळते रसायन, दोन २०० लिटर मापाच्या दोन बॅरेल व त्यामध्ये एकुण ४०० लिटर रसायन व ३५ लिटरच्या दोन प्लास्टीकच्या कॅनमध्ये एकुण ७० लिटर गावठी हातभट्टीची दारू, असा एकुण रु.२९,२५०/– चा मुद्देमाल मिळून आला. त्यानंतर जप्त मुद्देमालापैकी प्रत्येकी १८० मिली दारू व रसायन दोन काचेच्या बाटलीत सी.ए. सॅम्पलकामी वेगळी काढण्यात आली व त्याबाबतचा पंचनामा माझेसमक्ष माझे वरिष्ठांनी केला.

५. त्यानंतर सदर इसमास ताब्यात घेवुन त्याला फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४१अ अन्वये नोटीस देण्यात आली. त्यानंतर उर्वरित जप्त मुद्देमाल हा जागीच नष्ट करण्यात आला.

६. त्यानंतर सी.ए सॅम्पलकामीचा मुद्देमाल घेवुन आम्ही कार्यालयात आलो व त्यानंतर मी त्या इसमाविरूध्द फिर्याद दिली. आता मला दि.२६/०५/२०२४ रोजीची फिर्याद व छापील खबर दाखविण्यात आली. त्यावर माझे सहया असून त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे **नि.क्र.१५ व नि.क्र.१६** देण्यात येते. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. तो आजरोजी न्यायालयात हजर नाही. (आरोपीतर्फे गैरहजेरी माफिचा अर्ज देवुन आरोपीच्या विधीज्ञांनी आरोपीची ओळख आव्हानीत करणार नाही असे कथन केले.) त्यानंतर माझे वरिष्ट श्री.कुसळे यांची सदर गुन्हयाचा तपास केला.

सरतपास पुर्ण.

**<u>शपथेवर उलटतपास आरोपीतर्फे त्यांचे वकील श्री.ए.एच. पालवे :</u>**

७. छाप्याला जाण्याअगोदर त्याबाबतची नोंद मी स्वत: स्टेशन डायरीला

केली नव्हती व माझे वरिष्ठांनी ती नोंद केली की नाही हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, छाप्यावेळी पंच आमच्या सोबत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीमध्ये पंचांच्या नावांचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.२६/०५/२०२४ रोजी माझेसमक्ष कोणताही छापा टकण्यात आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा आमच्या कार्यालयात बसुन तयार करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी कुठलाही मुद्देमाल जप्त केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ वरिष्ठांच्या आदेशाचे पालन करण्याकामी आम्ही आरोपीविरूध्द खोटा गुन्हा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

(न्यायालयात साक्षीदारासमक्ष असणा–या स्क्रीनवर साक्षीदाराचा संपुर्ण जबाब हा साक्षीदाराला वाचुन दाखविण्यात आला व त्याने त्याबाबतची काहीही तक्रार नसल्याचे सरकारी वकीलांसमक्ष तोंडी सांगितले.)

माझे समक्ष जबाब श्रवणोत्तर स्वीकृत,

SACHIN RAJARAM SHINDE

Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.03.09 12:22:52 +0530

**(एस.आर. शिंदे)**

**दि.०९/०३/२०२६**

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१८, अहमदनगर.